सकाळ

पुणे, सोमवार, २० जानेवारी २०२५ १०

# भारताचा खो-खोमध्ये सुवर्ण इतिहास

## दोन्ही विभागांत नेपाळला हरवून विश्वविजेतपदाचा मान

नवी दिल्ली, ता. १९ : इंदिरा गांधी इनडोअर स्टेडियमच्या चकचकीत प्रकाशात आणि जल्लोषाच्या गजरात भारतीय पुरुष आणि महिला संघाने खो-खोच्या पहिल्या विश्वचषकाचे विजेतपद पटकावून इतिहास घडवला!

नेपाळला अंतिम सामन्यात पराभूत करत दोन्ही भारतीय संघाने संपूर्ण देशाला अभिमानाचा क्षण मिळवून दिला व भारतीय पुरुष व महिला संघाने प्रेक्षकांनी खचाखच भरलेल्या स्टेडियमवर भारताचे नाव विश्वचषकावर सुवर्ण अक्षरात कोरले. दोन्ही भारतीय खो-खो संघाने एक अनोखा आणि गौरवास्पद इतिहास रचला आहे. भारताच्या पुरुष आणि महिला संघाने खो-खोच्या पहिल्या विश्वचषकात संपूर्ण स्पर्धेत आपला दबदबा कायम ठेवत पहिले विश्वविजेतपद पटकावले. महिलांच्या सामन्यात भारताने नेपाळवर ७८-४० असा ३८ गुणांनी विजय साकारला. पुरुष अंतिम सामन्यात भारताने नेपाळला ५४-३६ असा १८ गुणांनी पराभूत केले.



विश्वकरंडक पटकावणारा भारतीय महिला खो-खो संघ.

### दोन कोटी २५ लाख अन् क्लास वनची नोकरी

■ सर्व सुवर्णपदक विजेत्या खेळाडूंना महाराष्ट्र शासनाच्या वतीने प्रत्येकी दोन कोटी २५ लाख रुपयांचे रोख पारितोषिक दिले जाणार आहे. तसेच थेट क्लास वन अधिकारी म्हणून नोकरीदेखील राज्य शासनाच्या वतीने दिली जाणार आहे, अशी माहिती भारतीय खो-खो महासंघाचे सहसचिव चंद्रजीत जाधव यांच्याकडून रविवारी देण्यात आली.